प्रामाणिकपणाचे महत्त्व

कनफ्यूशियसची कहाणी




लेखक: स्पेन्सर जॉन्सन

प्रामाणिकपणाचे महत्त्व

कनफ्यूशियसची कहाणी

मराठी अनुवाद: सुशील मेन्सन



ही एका प्रामाणिक माणसाची कथा आहे. ही कथा त्याच्या आयुष्यातील घटनांवर आधारित आहे. कनफ्यूशियसबद्दल इतर ऐतिहासिक घटना अंतिम पानावर दिलेल्या आहेत.



कोणे एके काळी, *कनफ्यूशियस* नावाचा एक छोटा मुलगा आपल्या आईवडिलांसोबत चीन देशातील *लू* प्रांतात राहात होता.

इतर मुलांसारखेच कनफ्यूशियसलाही खेळायला, नाचायला, गायला, हसायला आवडत असे. त्याला आपल्या आईवडिलांसोबत वेळ घालवायलाही आवडत असे.

त्याच्या आईवडिलांना वाटत असे की कनफ्यूशियस एक विलक्षण मूल आहे. खरंतर, यात काहीच नवल नाही. प्रत्येक आईवडिलांना त्यांचे मूल खास वाटत असते.

पण त्याचे वडील त्याच्याशी ज्या तऱ्हेने गप्पा मारत, ते मात्र विलक्षण होते.



कनफ्यूशियस केवळ तीन वर्षांचा असताना त्याच्या वडिलांनी एकदा त्याला जवळ बोलावले.

कनफ्यूशियस वडिलांच्या जवळ जाऊन उभा राहिला. वडिल त्याला म्हणाले, “मला ठाम विश्वास वाटतो की मोठा झाल्यावर तू एक खूप शहाणा माणूस बनशील आणि आपल्या शहाणपणाच्या जोरावर तू अनेक लोकांना मदत करशील.”

आपले बोलणे कनफ्यूशियसला कळले नाही, हे वडिलांच्या लक्षात आले. त्यांनी स्मित केले. “तू अजून लहान आहेस,” ते म्हणाले, “पण जेव्हा तू माझ्या बोलण्यावर गांभीर्याने विचार करू लागशील, तेव्हा समजेल तुला.”
कनफ्यूशियसने याबाबत विचार केला आणि निश्चय केला की जेव्हा तो मोठा होईल तेव्हा तो वडिलांना शहाणपणाविषयी जास्त काही सांगण्याची विनंती करेल. पण असे काही घडण्याआधीच त्याचे वृद्ध वडील आजारी पडले आणि त्यांचा मृत्यू झाला.





“मला बाबांची खूप आठवण येतेय,” तो आईला म्हणाला, “मला जाणून घ्यायचं होतं. त्यांनी असं का म्हटलं होतं की मी मोठा होऊन शहाणा माणूस बनेन?”

“त्यांचं तुझ्यावर खूप प्रेम होतं म्हणून म्हणाले असावेत असं,” आई म्हणाली. “त्यांना वाटत असावं की या गोष्टीवर तुझी श्रद्धा बसली की ते तू खरं करून दाखवशील.”

“पण मी ते खरं कसं करून दाखवायचं?” छोट्या कनफ्युशियसने विचारले. “मला तर हेसुद्धा माहीत नाही की शहाणा माणूस कसा असतो.”

कनफ्युशियस बसल्या बसल्या विचार करू लागला.

आणि मग अचानक काहीतरी घडले.

अचानक त्याला वाटले की काही चमत्कार होऊन त्याचे वृद्ध वडील त्याच्या डोळ्यांसमोर येऊन उभे राहिले आहेत. ते खूप छोटेसे होते – फक्त सहा इंचाचे!

“माझ्या छोट्या दोस्ता, तू खूप चिंतित दिसतोस,” तो छोटा माणूस म्हणाला.

कनफ्यूशियस हसू लागला. त्याला चांगलेच माहीत होते की सहा इंच उंच माणूस खऱ्या आयुष्यात अस्तित्वात नसतो. या छोट्याशा माणसाला त्याने आपल्या कल्पनेतून निर्माण केले होते. पण कनफ्यूशियसला शहाणपणाचे कोडे पडले होते आणि त्याविषयी त्याला कुणाशीतरी चर्चा करायला आवडत असे. कुणी नसले तर तो स्वत:शीच चर्चा करत बसे.



“हॅलो, छोटे बाबा,” कनफ्यूशियस म्हणाला.

“तू मला *साधू* म्हणू शकतोस,” छोटा वृद्ध माणूस म्हणाला.

“साधू?” कनफ्यूशियसने गोंधळून विचारले. “चमत्कारीक नाव आहे!”

“नाही, नाही,” छोटा माणूस म्हणाला. “खूप शहाण्या माणसाला साधू म्हणतात. मीसुद्धा खूप शहाणा माणूस आहे.”

कनफ्यूशियसचे डोळे चमकले. “तुम्ही शहाणे आहात? खूप छान! शहाणं कसं बनायचं, हे तुम्ही शिकवाल मला?”

छोटा माणूस म्हणाला, “शिकवण्यापेक्षा तुला शिकायला मदत करीन मी.”

“चालेल मला!” कनफ्यूशियस म्हणाला, “मग सगळ्यात आधी काय करू मी?”





“सुरुवातीला तुला अशा गोष्टी शिकाव्या लागतील ज्या इतरांना आधीच ठाऊक आहेत,” साधू म्हणाले. “चांगली पुस्तकं वाचून तू अशा गोष्टी शिकू शकतोस.”

कनफ्यूशियसच्या काळात, पुस्तके हाताने लिहिली जात, बांबूच्या पट्ट्यांवर. मग या पट्ट्या चामड्याच्या पट्ट्याने बांधत. आपल्या वडिलांची भविष्यवाणी खरी करण्यासाठी, शहाणा माणूस बनण्यासाठी कनफ्यूशियस इतका आतुर झाला की तो आपली पुस्तके पुन्हा पुन्हा वाचू लागला. त्यामुळे त्याच्या आईला बिचारीला चामड्याचे तुटलेले पट्टे परत परत बदलावे लागत असत.

“वाचन हे शहाणं बनण्याचा खूप चांगला मार्ग आहे,” साधू म्हणाला,” पण सगळंच शहाणपण पुस्तकांमध्ये मिळत नाही. इतरांना बघून, ऐकूनही बरंच काही शिकता येतं. लोक काय विचार करत असतील, त्यांच्या मनात काय भावना असतील हे समजून घ्यायचा प्रयत्न कर. लोकांनी बोलून दाखवलं नाही तरी त्यांना बारकाईने न्याहाळून त्यांच्या मनातल्या भावना ओळखता येतात.”

कनफ्युशियसने साधुची शिकवण अंमलात आणली आणि त्याला जाणवलं की खरंच इतरांना बघून, ऐकून त्याला बरेच शिकायला मिळत होते.

“बहुधा, शहाणा बनण्याच्या मार्गावर मी आता प्रगती करू लागलोय,” कनफ्यूशियसला वाटू लागले



कनफ्यूशियस आपल्या वयाच्या इतर मुलांपेक्षा शहाणा होता, पण त्याच्याकडे धन फारसे नव्हते. तो खूप लहान वयातच काम करू लागला होता. त्याला सर्वात पहिले काम मिळाले होते, जनावरांची देखभाल करण्याचे.

“तू या कामात कुशल आहेस,” कनफ्यूशियसचे थोडेफार काम झाल्यावर साधू म्हणाला. “तू देखभाल करायला सुरुवात केलीस तेव्हापासून, सगळी जनावरं किती निरोगी दिसतायत! त्यांची संख्यासुद्धा वाढलीय. एवढं छान काम कसं करतोस, छोट्या दोस्ता?”

“सहजच,” कनफ्यूशियस म्हणाला, “मी जनावरांना वेळेवर खायला देतो, त्यांच्यासोबत धावतो-पळतो. मी स्वतःची जशी काळजी घेतो तशीच त्यांचीसुद्धा काळजी घेतो.”





जनावरांच्या कळपातील बदल फक्त साधुलाच दिसला नाही. जनावरांचा मालकही कनफ्यूशियसच्या कामावर खुश होता. त्याने त्याच्यावर आणखी जबाबदारी सोपवली.

“आता तू धान्याचं वजन करून पोत्यांमध्ये भर,” मालक कनफ्यूशियसला म्हणाला, “आणि मग ही पोती नेऊन शहरातल्या लोकांना विक.”

“तू यातून स्वतःची कमाई काढू शकतोस,” बाजारात धान्य विकणारा दुसरा एक माणूस कनफ्यूशियसला म्हणाला. “पोत्यात धान्य भरताना वजनापेक्षा थोडं कमी भर. कुणाला कळणारसुद्धा नाही.”

“पण ही तर बेईमानी झाली,” कनफ्यूशियस म्हणाला. “इतर लोकांनी माझ्याशी बेईमानी करू नये, असं जर मला वाटत असेल तर मी इतरांशी बेईमानी कशी करू?”

धान्य खरेदी करण्यास आलेले लोक म्हणू लागले, “छोटा कनफ्यूशियस खूप प्रामाणिक आहे. तो कधीच वजनात कमी धान्य तोलून देत नाही.”

“हा माणूस तर माझ्या खूप कामाचा आहे,” नजिकचा एक दुकानदार म्हणाला. त्याने कनफ्यूशियसला आपल्या दुकानाचे कामकाज सांभाळायचे काम देऊ केले.

“छानच झालं!” कनफ्यूशियस साधूला म्हणाला. “या कामामुळे मला खूप लोकांना न्याहाळता येईल, त्यांना ऐकता येईल आणि खूप शिकता येईल.”

“अगदी बरोबर,” साधू म्हणाला, “पण हे विसरू नकोस की ते इतर लोकसुद्धा तुला न्याहाळत असतील.”

कनफ्यूशियस ही गोष्ट विसरला नाही. लोक आपल्याशी कसे वागले तर आपल्याला आवडेल, असा विचार करून तो गिऱ्हाईकांशी तसंच वागू लागला. त्यांचे सुट्टे पैसे पूर्ण परत करू लागला.



“तो प्रामाणिक माणूस आहे,” लोक म्हणू लागले. “शहाणासुद्धा. दुकानात काही काम नसलं की तो पुस्तक वाचत बसतो. या छोट्याशा मुलाला खूप ज्ञान आहे.”

कनफ्यूशियसची ख्याती वाढली. एकदा एक श्रीमंत माणूस त्याच्या दुकानात आला आणि त्याने कनफ्यूशियसला त्याच्या मुलाला शिकवायची विनंती केली. “मी तुझं शहाणपण आणि प्रामाणिकपणा यामुळे प्रभावित झालोय,” तो माणूस म्हणाला. “कृपया, तुमच्याकडे असलेलं ज्ञान माझ्या मुलालाही द्यावं.”

तुम्हाला काय वाटतं? कनफ्यूशियसने काय उत्तर दिले असावे?





तो शिक्षक बनण्यास तयार झाला. तो एवढा चांगला शिक्षक बनला की लवकरच त्याला अनेक विद्यार्थी मिळाले.

“मी एक शाळा उघडेन,” तो साधूला म्हणाला, “पण मी न्यायाने वागेन. मी फक्त श्रीमंत लोकांच्याच मुलांना नाही शिकवणार. मी शिकायची इच्छा असलेल्या गरीब मुलांनासुद्धा शिकवणार. माझ्याकडे एक योजना आहे त्यासाठी.”

मग कनफ्यूशियस सगळ्या श्रीमंत विद्यार्थ्यांच्या वडिलांकडे गेला. “तुमच्या मुलाच्या शिक्षणासाठी तुम्हाला जास्त पैसे द्यावे लागतील,” तो त्यांना म्हणाला. “यामुळे मी गरीब मुलांना विनामूल्य शिकवू शकेन. मला प्रामाणिकपणे सांगा की तुमच्याकडे किती धन आहे. मग मी तुम्हाला सांगेन की तुमच्या मुलाच्या शिक्षणासाठी तुम्ही मला किती पैसे द्यायचे ते.”

त्या श्रीमंत लोकांना कनफ्यूशियसची कल्पना पसंत पडली नाही. गरीब लोकांच्या मुलांना शिकायची गरजच काय, असे त्यांचे मत होते. पण आपल्या मुलांनी कनफ्यूशियसकडूनच शिकावे, ही त्यांची तीव्र इच्छा होती. म्हणून मग एक-एक करून सगळ्यांनी त्यांच्याकडे असलेल्या धनसंपत्तीची माहिती कनफ्यूशियसला दिली.

गरीब विद्यार्थ्यांच्या पालकांनीही आपल्या संपत्तीची माहिती त्याला दिली. त्यांच्यातील काही लोक अत्यंत गरीब होते. त्यांना आपल्या हलाखीची परिस्थिती सांगण्यास शरम वाटली.

मग कनफ्यूशियसने प्रत्येक पालकाला सांगितले की त्यांनी किती पैसे त्याला द्यावेत. अशा प्रकारे त्याची शाळा सुरू झाली. या शाळेत फक्त मुलगेच होते. कारण त्याकाळी मुलींना शिक्षण घ्यायला परवानगी नव्हती.

तुम्हाला काय वाटते, कनफ्यूशियस या विद्यार्थ्यांना पहिला धडा कोणता देईल?




हा धडा दोन महत्त्वाच्या शब्दांविषयी होता.

“मी तुमच्या वडिलांना त्यांच्या संपत्तीबद्दल प्रश्न विचारला, तो तुमच्यापैकी किती जणांनी ऐकला?” कनफ्यूशियसने त्याच्या विद्यार्थ्यांना विचारले.

अनेक गरीब आणि श्रीमंत विद्यार्थ्यांनी आपले हात वर उचलले. त्या प्रांताच्या सत्ताधारी ड्यूकचा (सरदाराचा) मुलगाही त्या वर्गात होता. त्यानेही आपला हात वर उचलला.

“माझ्या प्रश्नाचं उत्तर देण्याआधी तुमच्या वडिलांनी काय करायला हवं होतं?” कनफ्यूशियसने मृदू स्वरात विचारले. “माझ्याशी प्रामाणिक राहाण्याआधी त्यांनी कुणाशी प्रामाणिक राहायला हवं होतं?”



विद्यार्थी विचार करू लागले. एक विद्यार्थी म्हणाला, “त्यांनी स्वत:शी प्रामाणिक राहायला हवं होतं.”

“अगदी बरोबर,” कनफ्यूशियस खुश होऊन म्हणाला. मग त्याने आणखी एक प्रश्न विचारला. प्रश्नांवर प्रश्न विचारून शिकवायची ही पद्धत अगदी योग्य होती.


“जर मी तुम्हाला सांगितलं की सचोटी आधी येते, प्रामाणिकपणा नंतर आणि दोन्ही शब्द सच्चेपणाशी संबंधीत आहेत, तर तुम्ही मला या दोन शब्दांचा अर्थ सांगू शकाल का?”


साधूने स्मित केले, कारण त्याला कनफ्यूशियसच्या प्रश्नांची उत्तरे माहीत होती. तुम्हाला माहीत आहेत का याची उत्तरे?



शाळेच्या विद्यार्थ्यांना यावर विचार करावा लागला. काही क्षणांनी एक विद्यार्थी - तोच जो लू प्रांताच्या सत्ताधाऱ्याचा मुलगा होता – हात वर उचलून म्हणाला, “माझ्या मते, सचोटीचा अर्थ आहे, स्वतःशी खरं बोलणं आणि प्रामाणिकपणाचा अर्थ आहे, इतरांशी खरं बोलणं.”

“अगदी बरोबर!” कनफ्यूशियस आनंदाने म्हणाला. “अगदी अचूक अर्थ सांगितलास. जर तुमच्यापैकी कुणाचे वडील त्यांच्या संपत्तीबद्दल माझ्याशी खरं बोलले नसते तर मला कळलं नसतं. पण त्यांच्या मनाला ही गोष्ट टोचत राहिली असती की ते सचोटीने वागले नाहीत आणि कदाचित त्यामुळे ते बेचैन राहिले असते.”






वर्गात अगदी मागे बसलेले दोन विद्यार्थी आपल्या बोलण्याकडे लक्ष देत नाहीत, हे कनफ्यूशियसच्या लक्षात आले. त्याने त्यांच्याकडे तिरप्या नजरेने पाहिले, पण तो त्यांना ओरडला नाही की खेकसला नाही. त्याने शांतपणे त्या विद्यार्थ्यांना वर्गाबाहेर जाण्यास सांगितले. “ज्याला कुणाला शिकायची खरीखुरी आस्था आहे, त्याला मी जरूर शिकवेन,” तो म्हणाला, “पण मी कुणाला माझं बोलणं ऐकून घ्यायची सक्ती करणार नाही.”

दोन्ही विद्यार्थी वर्गातून निघून गेले. पण त्यामुळे नंतर वर्गात काय झाले, हे त्यांना कळले नाही.

कनफ्यूशियस जाणत होता की काही लोकांना उदाहरण देऊन चांगले समजते. म्हणून तो विद्यार्थ्यांच्या पुढ्यात जाऊन उभा राहिला.

त्याने एक फुलदाणी हातात धरली, जेणेकरून सर्व विद्यार्थ्यांना ती दिसू शकेल. त्याच्या दुसऱ्या हातात एक सफरचंद होते. सगळ्यांसमोर त्याने ते सफरचंद त्या फुलदाणीत टाकले आणि तिला फरशीवर ठेवले.

"तुमच्यापैकी जो कुणी सफरचंद फुलदाणीच्या बाहेर काढेल, तोच ते सफरचंद खाऊ शकेल," तो म्हणाला.





एका विद्यार्थ्याला खूप भूक लागली होती. तो वेगाने पळत आला आणि त्याने फुलदाणीच्या तोंडात हात घातला. त्याने सफरचंद मुठीत पकडले आणि तो हात बाहेर काढू लागला, पण त्यात त्याला यश मिळाले नाही.

"हात अडकला माझा," तो ओरडला.

"जोवर तू मुठीतून सफरचंद सोडून देत नाहीस, तोवर तुला हात बाहेर काढता यायचा नाही," कनफ्यूशियस म्हणाला.

त्याला सफरचंद सोडायचे नव्हते, पण शेवटी सोडूनच द्यावे लागले. आपला हात फुलदाणीतून बाहेर काढून तो गोंधळल्यागत इथे-तिथे बघू लागला.

तुम्हाला उपाय सुचतोय का, सफरचंद फुलदाणीबाहेर काढायचा?

कनफ्यूशियसने फुलदाणी उचलून उलटी केली. सफरचंद खाली पडले, त्याच्या हातात. सगळे विद्यार्थी हसू लागले. किती सोपे होते हे काम!

“पण हे दिसतं, तितकं सोपं नाही,” हातातील सफरचंद दाखवत कनफ्यूशियस म्हणाला. “एखाद्या वस्तुचा त्याग करणं, ही सोपी गोष्ट नाही. पण ती वस्तू पकडून ठेवण्याच्या प्रयत्नात आपल्याला जे हवंय ते मिळत नाही हे कळलं तर तिचा त्याग करण्यातच शहाणपणा असतो. जर तुम्ही एखादं चुकीचं काम करत असाल तर ते न करणं श्रेयस्कर असतं. जर तुम्ही स्वत:शी तसंच दुसऱ्यांशी प्रामाणिक नसाल तर ही बेईमानी सोडून देणंच चांगलं. तेव्हाच तुम्ही तुमचं ध्येय प्राप्त करू शकाल.”

“मी आधी कुणाला अशा तऱ्हेने शिकवताना पाहिलं नाहीये,” साधू कनफ्यूशियसच्या कानात पुटपुटला. “तुझ्या वडिलांनी तुझ्याबद्दल केलेली भविष्यवाणी खरी ठरणार, असं दिसतंय. खात्री आहे मला याची!”





लवकरच कनफ्यूशियसची ओळख एक कुशल शिक्षक म्हणून होऊ लागली. राज्यातील काही लोक दूर जंगलात राहात. तिथे शाळा नव्हती. कनफ्यूसियसला अशा लोकांविषयी कळले की तो त्यांच्याकडे जात असे आणि त्यांच्याशी शहाणपण, नैतिकता आणि आनंद यांविषयी गप्पा मारत असे.


त्याकाळी बहुतेक लोक पायी पायी प्रवास करत. कनफ्यूशियससुद्धा मैलोनमैल चालत प्रवास करत असे. यात भरपूर वेळ खर्च होतो म्हणून कनफ्यूशियसने ठरवले की तो प्रवासादरम्यानही लोकांना शिकवणार. जे लोक शिकण्यासाठी त्याच्यासोबत प्रवासाला जात, ते त्याचे शिष्य म्हणून ओळखले जाऊ लागले.

कनफ्यूशियसचा प्रवासमार्ग बहुधा शांत आणि दीर्घ पल्ल्याचा असे. पण एकदा त्याला नजिकच्या जंगलातून गुरगुरण्याचे भयानक आवाज ऐकू आले.

“बघ,” साधू ओरडला. त्याने एका वृद्ध स्त्रीकडे इशारा केला. ती एका तरूणाच्या मृत शरीराजवळ बसून विलाप करत होती.

“सावध व्हा,” एक शिष्य ओरडला. “आत्ताच मी एक वाघ जंगलात पळताना पाहिला.”

तुम्हाला काय वाटते, काय झाले असावे?



“त्याने माझ्या मुलाला मारून टाकलं,” एक वृद्ध स्त्री रडत म्हणाली. “वाघाने माझ्या मुलाला मारून टाकलं,” ती गहिवरल्या स्वरात हुंदके देत बोलू लागली. “याच जागेवर वाघाने माझ्या नवऱ्यालासुद्धा मारून टाकलं होतं आणि त्याआधी माझ्या वडिलांनासुद्धा एका वाघानेच मारलं होतं.”

“पण तुम्ही अशा जागी राहाताच का?” कनफ्यूशियसने वृद्ध स्त्रीला विचारले. “ज्या वाघाने तुमच्या लाडक्या आप्तांना मारून टाकलं त्या वाघाची तुम्हाला भीती, तिरस्कार वाटत नाही का?”






वृद्ध स्त्रीने मान डोलावली, “हो मी घाबरते वाघाला. पण मी दुसरीकडे राहायला गेले तर माझं काय होईल, हा विचार मला जास्त अस्वस्थ करतो. किमान इथले लोक दयाळू आणि प्रामाणिकतरी आहेत.”

“ठीकाय,” कनफ्यूशियस म्हणाला आणि मग ती स्त्री गेल्यानंतर तो आपल्या शिष्यांना म्हणाला, “आत्ता तुम्ही जे काही बघितलंत, त्यावर विचार करा आणि मग स्वत:लाच प्रश्न विचारा, लोक हिंस्त्र पशुंना जास्त घाबरतात की दुष्ट, बेईमान लोकांना?”

चांगल्या शिक्षकाप्रमाणे कनफ्यूशियस एक चांगला विद्यार्थीही होता. त्यामुळे साधू, जो आणखी कुणी नसून कनफ्यूशियसचा आत्माच होता, त्याला सुचवू लागला की त्याने *लोयांग* शहरात जाऊन तेथील प्रसिद्ध ग्रंथालयात अभ्यास करायला हवा. कनफ्यूशियसने साधूच्या सल्ल्यानुसार केले.

त्याकाळी चीन बऱ्याच राज्यांमध्ये विभागलेला होता. प्रत्येक राज्याचा वेगळा शासक होता, त्याला *ड्यूक* म्हणत. कनफ्यूशियसने लोयांगला जाण्यासाठी लू शहराच्या ड्यूककडे मदत मागितली. कारण लोयांग शहर खूप दूर होते. ड्यूकने त्याला एक गाडी दिली आणि मग तो आपल्या दोन शिष्यांसमवेत निघाला.

“आता तू शांतपणे अभ्यास आणि चिंतन-मनन करू शकतोस,” साधू म्हणाला, “आणि एक शहाणा माणूस बनू शकतोस.”





कनफ्यूशियसने कित्येक वर्षे लोयांगमध्ये राहून अभ्यास केला. तेथील उत्कृष्ट ग्रंथालयात त्याने बरीचशी पुस्तके वाचली. तो एक वाद्य वाजवायलाही शिकला आणि तीनशेपेक्षा जास्त गाणी गायला शिकला.

“मित्रा, एवढा अभ्यास करून, संगीताचा आनंद घेऊन तू खूप शहाणपणाचं काम केलंयस,” साधू म्हणाला. “हा धकाधकीपासून मुक्त होण्याचा चांगला मार्ग आहे.”

“नक्कीच,” कनफ्यूशियस म्हणाला. “नवं संगीत शिकायला सुरुवातीला कठीण जातं. पण एकदा शिकलं की त्यातून मला खूप शांत शांत वाटतं.”

काही काळानंतर, कनफ्यूशियस आपल्या लू शहरात परतला. अर्थातच, त्याच्यासोबत साधू आणि ते दोन शिष्यसुद्धा परतले. तिघांनी बरेच दिवस प्रवास केला. शेवटी ते एका परिचित शहरात पोहोचले.

ते शहराच्या सीमेवरच्या भिंतीबाहेर आराम करण्यासाठी थांबले. कनफ्यूशियसने भिंतीमधील एका मोठ्या भोकाकडे इशारा करत म्हटले, “गेल्या वेळी मी या शहरात आलो होतो तेव्हा या भोकातून शहरात प्रवेश केला होता.”

त्या शहरातील काही नागरिक आसपास उभे होते. कनफ्यूशियसचे बोलणे ऐकून ते चमकले. त्यांच्यापैकी एक म्हणाला, “एकदा *यांग हो* नावाच्या एका दुष्ट माणसाने या भोकातून शहरात प्रवेश केला होता.”

“हा परका माणूस यांग हो सारखाच दिसतोय,” दुसरा एक म्हणाला.

मग त्यांनी लगेच पोलिसांना बातमी दिली की यांग हो नावाचा दुष्ट अपराधी शहराच्या सीमेवर आराम करतोय. त्याला तात्काळ अटक करून शिक्षा करण्यात यावी.

कनफ्यूशियस आराम करत असताना त्याला पोलिसांनी घेरले.


मग काय झाले, माहीत आहे का?



पोलिसांनी कनफ्यूशियसला अटक करून तुरुंगाच्या अंधारकोठडीत बंद केले.

आधी कनफ्यूशियस घाबरला. त्याला अगदी एकाकी वाटू लागले. मग त्याने स्वत:ला आठवण करून दिली की तो एकाकी नव्हता. साधू होता त्याच्यासोबत, जो नेहमी त्याच्यासोबत छान छान बोलत असे. कारण तो दुसरा कुणी नसून कनफ्यूशियसच्या चांगल्या विचारांचेच प्रतिरूप होता. पण तरीही कनफ्यूशियसला तुरुंगात अस्वस्थ वाटू लागले.

“आपण दुसऱ्यांशी असं वागू नये, जसं आपल्याशी कुणी वागलेलं आपल्याला आवडत नाही, हे यांग हो शिकला असता तर बरं झालं असतं,” कनफ्यूशियस म्हणाला. “तो हे शिकला असता तर आज मी तुरुंगात नसतो.”





“तुला इथे जास्त काळ ठेवणार नाहीत,” साधूने त्याचे सांत्वन केले.

कनफ्यूशियसचे शिष्य धावतपळत लूला गेले आणि तेथील लोकांना सांगितले की कनफ्यूशियसला तुरुंगात टाकले. कनफ्यूशियसला ओळखणारे लोक त्वरीत तुरुंगात गेले आणि त्यांनी ग्वाही दिली की कनफ्यूशियस एक प्रतिष्ठित माणूस होता, त्याच्याशी सन्मानपूर्क वागले पाहिजे. मग पोलिसांनी लगेच त्याला मुक्त केले.

“तर या घटनेतून काय शिकलात तुम्ही?” घरी निघाल्यावर कनफ्यूशियसने शिष्यांना विचारले.


एक तरूण म्हणाला, “जेव्हा लोकांना कळतं की तुमचं वागणं चांगलं आहे, तेव्हा तुमच्यासोबत ते चांगलंच वागतात.”

कनफ्यूशियस आणि त्याचे शिष्य घरी पोहोचणार इतक्यातच, त्यांनी शाही दूत त्यांच्या दिशेने येत असल्याचे पाहिले.

कनफ्यूशियसला नमस्कार करून दूत म्हणाला, “महोदय, लूच्या ड्यूकने आपल्याला राजवाड्यात बोलावलंय.”

कनफ्यूशियस दूतासोबत राजवाड्यात जायला तयार झाला. साधुसुद्धा उत्साहीत झाला. त्याला माहीत होते की लूचा ड्यूक पूर्वी कनफ्यूशियसचा विद्यार्थी होता. “मला मोठं कुतूहल वाटतंय की ड्यूकला तुला का भेटायचंय,” साधू म्हणाला.





कनफ्यूशियस आणि साधूला लवकरच याचे कारण कळले. तरूण ड्यूकची इच्छा होती की कनफ्यूशियसने राज्याचे शासन चालवण्यात त्याला मार्गदर्शन करावे.

“मला खूप आवडेल हे काम,” कनफ्यूशियस ड्यूकला म्हणाला. “मला नेहमीच वाटायचं की माझ्या विचारांचा व्यावहारीक प्रयोग करायला हवा, ज्यामुळे मी जास्तीतजास्त लोकांना मदत करू शकेन.”

आणि मग लूचा ड्यूक कनफ्यूशियसच्या सल्ल्यानुसार काम करू लागला. तो सगळ्यांसोबत न्यायपूर्ण आणि निष्पक्ष वर्तन करू लागला आणि सर्वांशी आदराने वागू लागला.

मग काय झाले असावे, तुम्हाला काय वाटते?

शासक आपल्या प्रजेसोबत प्रामाणिकपणे आणि आदरपूर्ण वागत असल्यामुळे लूची जनतासुद्धा एकमेकांसोबत प्रामाणिक वर्तन करू लागली. व्यापारी गिऱ्हाईकांना फसवत नसत, मजूर खूप मेहनतीने काम करू लागले, रस्ते आणि पुलांची देखरेख-दुरुस्ती चांगली होऊ लागली, धान्याचे भरघोस उत्पादन झाले, लोकांचे आरोग्य सुधारले, सगळे एकमेकांशी मृदू वर्तन करू लागले आणि त्यामुळे प्रसन्न दिसू लागले.

हळूहळू चोर-लुटारूंना तिथून हाकलून देण्यात आले. लू शहर खूप सुरक्षित ठिकाण बनले. श्रीमंत-गरीब, वृद्ध-तरूण अशा सगळ्यांनाच तेथील न्यायालयांमध्ये निष्पक्ष न्याय मिळू लागला. प्रामाणिकपणाला बक्षीस मिळू लागले आणि बेईमान लोकांना शिक्षा मिळू लागली.

लू शहराचे लोक सुखाचा अनुभव घेऊ लागले.







बऱ्याचदा लू चे नागरीक वाटेत थांबून एकमेकांशी नव्या जीवनशैलीविषयी बोलत असत.

“किती अद्भूत आहे हे?” ते म्हणत. “आपण एकमेकांशी सन्मानपूर्वक वागतो तेव्हा आयुष्यात किती सुधारणा होते! कनफ्यूशियस आपल्या ड्यूकना किती चांगली शिकवण देतायत! आपले ड्यूकसुद्धा त्यांचा सल्ला मानण्याइतके शहाणे आहेत.”

अशा प्रकारे तीन वर्षे लूमधील जनजीवन खूप सुखात गेले. पण इतरत्र लोक सुखी नव्हते. लूच्या शेजारी असलेल्या *ची* प्रांताचा ड्यूक प्रामाणिक नव्हता, दयाळूही नव्हता. तो शेतकऱ्यांवर जास्त कर लावून स्वत: श्रीमंत बनला होता. पण तो शेतकऱ्यांना योग्य मोबदला देत नसे.

“सावध राहा,” ड्यूकचे मित्र त्याला म्हणू लागले. “राज्याची प्रजा तुमच्याविरोधात बोलतेय. तुम्हीसुद्धा लूच्या ड्यूकसारखं बनावं, असं त्यांना वाटतंय.”

कपाळावर आठ्या घालत चीचा ड्यूक म्हणत असे, “स्वत:ला बदलायचा माझा काहीही इरादा नाही. मला वाटतं लूच्या सरदारानेच आपलं वागणं बदलावं. कनफ्यूशियसला तिथून हटवलं तर लूचा ड्यूक आपलं वागणं बदलू शकेल. सगळ्या त्रासाचं मूळ तोच आहे.”
चीचा ड्यूक कट शिजवू लागला.




त्याने लूच्या सरदाराला भेट म्हणून 85 सुंदर नर्तिका आणि 125 दिमाखदार घोडे पाठवले. “ही माझ्याकडून एक भेट आहे,” तो म्हणाला, “आपल्याप्रती माझा आदर आणि कौतुक व्यक्त करण्यासाठी.”

निश्चितच तो खोटे बोलत होता. त्याचा कुटील हेतू होता की लूचा ड्यूक या भेटवस्तुंमध्ये दंग होऊन जाईल आणि कनफ्यूशियसकडे दुर्लक्ष करेल.

त्याचे हे कारस्थान यशस्वी झाले. लूचा ड्यूक आपल्या मनोरंजनात इतका व्यस्त झाला की त्याला आपली जनता आणि कनफ्यूशियसची चिंताच उरली नाही.

“आता तू काय करशील?” साधूने कनफ्यूशियसला विचारले. “ड्यूक तुझं काहीच ऐकत नाहीये. तो तर तुला भेटायलाच मागत नाहीये.”


कनफ्यूशियसने दीर्घ श्वास घेतला. त्याला उपाय माहीत होता. “मी बळ वापरून कुणाला शहाणा करू शकत नाही,” तो म्हणाला. “आपण हे राज्य सोडून जाऊया.”




कनफ्यूशियस गुपचुप राजवाड्याबाहेर पडला. जाताना अनेकदा त्याने मागे वळून पाहिले. ड्यूक कुणा दुताला मापल्या मागे पाठवेल, अशी त्याला आशा वाटत होती. पण तसे काही घडले नाही. लूचा ड्यूक चीच्या ड्यूकने पाठवलेल्या भेटवस्तुंचा आनंद घेण्यात व्यस्त होता. त्याला आपल्याशिवाय इतरांच्या भावनांची कदर नव्हती.

कनफ्यूशियसने आजुबाजुच्या राज्यांचा विचार केला. “आपण *वे*ईला जाऊ,” तो म्हणाला. “किंवा *सुंग*चा ड्यूक आपले यथोचित स्वागत करेल.”

कनफ्यूशियस आणि त्याचे शिष्य गावांमध्ये भटकू लागले. कुठे जायचे हे त्यांना निश्चित करता येईना. त्यांनी मागे वळून पाहिले तेव्हा काही सैनिक आपला पाठलाग करत आहेत, असे त्यांना दिसले.





“ही तर चीच्या ड्यूकची सेना आहे,” साधू म्हणाला. “तो तुझा तिरस्कार करतो, कारण तुझं म्हणणं आहे की राजाला न्यायप्रिय आणि सदाचारी असलं पाहिजे आणि तो तसा नाही. त्याला भय वाटतं की तुझ्या प्रभावाखाली येऊन त्याची प्रजा त्याच्या विरोधात उभी राहील आणि मला भय वाटतंय की कदाचित त्याचे सैनिक आता तुला जिवंत ठेवणार नाहीत.”

“शक्य आहे,” कनफ्यूशियस म्हणाला.

मग पाऊस पडू लागला म्हणून कनफ्यूशियसने एका विशाल झाडाखाली आसरा घेतला आणि तो वाट पाहू लागला.


त्याचे शिष्य खूप चिंतेत पडले. त्यांच्यापैकी काहीजणांना आपल्या शिक्षकासोबत राहायचे होते. इतर तिथून पळून जायचा विचार करत होते. “आपण थांबलो तर ठार मारले जाऊ,” ते म्हणाले. “सैन्यासमोर आपला काय निभाव लागणार!”

त्यांना चिंतित बघून कनफ्यूशियसने आपल्या तीन प्रिय शिष्यांना जवळ बोलावले.

“तुमच्या शिक्षकाकडे ड्यूकएवढी शक्ती नाही, तुमचं म्हणणं ऐकून घेणारं कुणी नाही आणि काही वेळातच तुमचा शिक्षक ठार मारला जाणार आहे, तर तुमचा शिक्षक शहाणा माणूस आहे, असं तुम्हाला वाटतं का?”

पहिले दोन शिष्य गोंधळले, घाबरले.

“माहीत नाही,” त्यांच्यापैकी एकजण म्हणाला.



"मला नाही सांगता यायचं," दुसरा एकजण म्हणाला.

तिसरा शिष्य काय म्हणाला, माहित आहे?

त्याने मोठ्या आदराने कनफ्यूशियसकडे पाहिले. "आपले काम आहे, सत्याचा मार्ग दाखवणे," तो म्हणाला. "आपण स्वत:शी आणि इतरांशी प्रामाणिक असलंच पाहिजे. आपण तेच करायला हवं, जे आपल्याला योग्य वाटतं. जर इतर लोक सत्य स्वीकारत नसतील, तर तो त्यांचा दोष आहे. इतरांची स्वीकृती मिळावी म्हणून आपण सत्य बदलू शकत नाही. असं केल्यावर आपण स्वत:च दुखी होऊ."

कनफ्यूशियस स्मित करून म्हणाला, "तू तुझा अभ्यास चांगलाच शिकलायस. खूप छान बोललास."






मग पाऊस बरसू लागला आणि कनफ्यूशियस झाडाखाली सारंगी वाजवू लागला, गाणे गाऊ लागला. आपल्या डोक्यावर संकट घोंघावत आहे, हे तो जाणत होता, पण तो प्रसन्न दिसत होता. आपण एक भला आणि प्रामाणिक माणूस आहोत, हे त्याला माहीत होते. सैनिकांनी त्याला मारून टाकले तरी ते हे सत्य मिटवू शकत नव्हते.

पण सैनिक कनफ्युशियसला मारू शकले नाहीत, कारण त्याचे बरेच हितचिंतक मित्र होते. त्याचा एक शिष्य धावत धावत अशाच एका मित्राची मदत मागायला गेला.

तो मित्र एक शक्तिशाली माणूस होता आणि त्याचे स्वत:चे सैन्य होते. जेव्हा त्याला कळले की एक शत्रू सैन्य कनफ्यूशियसला ठार मारणार आहे, तेव्हा त्याने आपल्या सैन्याधिकाऱ्यांना बोलावले आणि त्यांना कनफ्यूशियसचे रक्षण करायला सांगितले.


दुष्ट राजाच्या सैन्याने या सेनाधिकाऱ्यांना येताना पाहिले तेव्हा ते पळून गेले. त्यांना कनफ्यूशियसला मारायचे होते, पण युद्ध करायचे नव्हते.



काही लोकांना वाटत असे की कनफ्यूशियस हा आदर्श माणूस आहे. कारण तो अगदी विनम्र आणि प्रामाणिक होता. पण कनफ्यूशियस आणि साधू जाणत होते की असे काही नव्हते. कनफ्यूशियससुद्धा इतरांसारखाच होता. तो सुद्धा कधी कधी चुका करत असे.

एकदा तो जंगलात एका छोट्याशा झोपडीत राहात होता, तेव्हा एक माणूस त्याला भेटायला आला. कनफ्यूशियसला त्याचे येणे अजिबात आवडले नव्हते.

“मला या माणसाचा चेहरासुद्धा बघावासा वाटत नाही,” कनफ्यूशियस म्हणाला. “मला तो अजिबात आवडत नाही. मी त्याच्याशी अगदी रुक्षपणे वागेन.”





कनफ्यूशियस आपल्या एका शिष्याला म्हणाला, “मी घरी नाही, असे त्या माणसाला सांग.” मग तो आपल्या झोपडीत बसून मोठमोठ्याने गाणे-बजावणे करू लागला, ज्यामुळे त्या माणसाला कळेल की तो घरीच आहे.

“तू खोटं बोललास,” साधू म्हणाला, “आणि त्या माणसाच्या भावनांना ठेच पोहोचवलीस.”

कनफ्यूशियसला जाणीव होती की साधूचे म्हणणे खरे आहे. तो या विषयावर जेवढा विचार करत असे, तेवढेच त्याचे मन विचलित होत असे.

“हरकत नाही,” साधू म्हणाला. “चिंता करून काही फायदा नाही. फक्त आपल्या चुकांमधून शिकायचा प्रयत्न कर.”

जसजसे वय वाढत गेले तसतसे कनफ्यूशियसचे ज्ञान वाढत गेले. वाचन करून, निरीक्षण करून आणि लक्षपूर्वक ऐकून तो बरेच काही शिकला. तो आपल्या चुकांमधूनही शिकला.

चौदा वर्षे संपूर्ण चीनमध्ये भ्रमण करून त्याला पुन्हा त्याच्या लू राज्यातून बोलावणे आले. पुन्हा एकदा त्याला राजदरबारात स्थान देण्यात आले आणि ड्यूक त्याच्या सल्ल्यानुसार वागू लागला.

आता कनफ्यूशियस स्वतःसुद्धा साधुसारखा दिसू लागला होता. हा साधू त्याच्या अंतर्मनात नेहमी काहीतरी पुटपुटत असे. ते कुणालाही कळत नसे. खरंतर, कनफ्यूशियस आता स्वतःच साधू बनला होता.



"मी पुस्तकं वाचून बरंच काही शिकलो," कनफ्यूशियस साधुला म्हणाला. "कदाचित, आता मला स्वतःच एक पुस्तक लिहायला हवं."

"पटतंय मला तुझं," साधू म्हणाला. "शीर्षक काय असेल तुझ्या पुस्तकाचं?"

"*वसंत आणि पानगळ,*" कनफ्यूशियस उत्तरला. "हे पुस्तक लू राज्याच्या इतिहासाविषयी असेल. मागल्या 250 वर्षांत इथे काय काय झालं यावर मी या पुस्तकात लिहीन. काय योग्य आणि विवेकी होतं, काय अनुचित आणि अविवेकी होतं ते लिहीन. ते वाचून लोक शिकू शकतील."





"पण त्याच्या ज्ञानाचं भांडार इतकं विशाल आहे," कनफ्यूशियसचे शिष्य म्हणाले. "एवढं सगळं ते एकटे कसं काय लिहू शकतील? आपण त्यांना मदत केली पाहिजे, या कामात."

अशा प्रकारे, कनफ्यूशियसचे शिष्य त्याचे विचार लक्षपूर्वक ऐकून ते लिहू लागले. 2500 वर्षांपूर्वीच्या या शिक्षकाविषयी आपण जे काही जाणतो ते त्याच्या या शिष्यांनी लिहून ठेवलेल्या गोष्टींमुळेच.

त्यांनी लिहिलेली एक गोष्ट अशी होती: *जेव्हा कुणी मनुष्य स्वतःशी प्रामाणिक असतो तेव्हा त्याच्यात आत्मभान येतं. समाजातील बरेच लोक असं करतात तेव्हा जग जास्त सुंदर बनू लागते.*

कनफ्यूशियसच्या काळाच्या तुलनेत आज चीनमध्ये बरेच बदल घडून आलेले आहेत. आज चीनने आधुनिक युगात प्रवेश केला आहे. अनेक बाबतीत लोक बदलले आहेत. पण कित्येक बाबतीत ते आजही पूर्वीसारखेच आहेत. ते आजदेखील कनफ्यूशियसबद्दल बोलतात, त्याला जाऊन हजारो वर्षे झाल्यावरही. तो जे काही बोलून गेला ते त्यांना कदाचित पटत असावे.


कनफ्यूशियसचे बरोबर होते का? स्वत:शी आणि इतरांशी प्रामाणिक राहिले की आपल्यात आत्मभान येते, आपल्याला बरे वाटते असे तुम्हाला वाटते का?

आपल्या आयुष्यात प्रामाणिकपणाला किती महत्त्व आहे, हे फक्त आपणच जाणू शकतो. पण तुम्ही जो काही निर्णय घ्याल, त्याने तुम्हाला स्वत:ला बरे वाटेल, अशी आशा वाटते.

आपला मित्र कनफ्यूशियसने केले, तसेच.



काही ऐतिहासिक सत्ये



कनफ्यूशियसचा जन्म 2500 वर्षांपूर्वी लू राज्यात झाला होता. हा प्रांत आज चीनच्या *शांतुंग* राज्याचा भाग आहे. तो *त्साओ* जिल्ह्याचे प्रधान *शुह-लियांग हीह* यांचा एकुलता एक मुलगा होता. कनफ्यूशियसचा जन्म झाला तेव्हा शुह-लिआंगचे वय सत्तर वर्षांपेक्षाही जास्त होते.

कित्येक विद्वान आणि इतिहासकार कनफ्यूशियसला एक पवित्र महापुरुष मानतात. पण कनफ्यूशियस पारंपरिकदृष्ट्या धार्मिक नव्हता. त्याच्या मते, अंतरात्म्याचा विकास हाच आयुष्याचा हेतू असतो. त्याने प्रामुख्याने चार विषय शिकवले: *साहित्य, मनुष्य व्यवहार, स्वनिष्ठा आणि सामाजिक नात्यांमध्ये प्रामाणिकपणा.*

कनफ्यूशियस त्याच्या शिक्षणाचे सार *शू* या शब्दात व्यक्त करत असे. हे आपल्या *गोल्डन रूल (स्वर्ण नियम)* सारखेच आहे. तो सतत म्हणत असे, दुसऱ्यांशी असे वागू नका, जसे वागणे इतरांकडून तुम्हाला अपेक्षित नाही.

अनेक वर्षे, अभ्यास आणि शिक्षणकार्य करता करता, कनफ्यूशियसने संपूर्ण चीनमध्ये प्रवास केला. तो 52 वर्षांचा होता तेव्हा, त्याला आपल्या लू राज्यातून बोलावणे आले. तिथे त्याला *चुंग-तू* यांचा गव्हर्नर म्हणून नियुक्त करण्यात आले. त्याचे समाजसुधारणेचे कार्य आजही पुरोगामी मानले जाते. त्याने गरीबांना अन्न दिले तसेच तरुणांना, वृद्धांना योग्य अन्न मिळेल हे पाहिले. त्याने मजुरांची श्रमशक्ती योग्य तऱ्हेने वापरली. त्याने अशक्त मजुरांना सोपी कामे दिली, ताकदवान मजुरांना अवघड कामे दिली. त्याच्या देखरेखीत संपर्क व्यवस्था सुधारली, रस्त्यांची व पुलांची दुरुस्ती झाली आणि डोंगरदऱ्यांत लपून राहाणाऱ्या चोर-डाकूंचा समूळ नायनाट झाला. लोकांना अत्याचारापासून मुक्ती मिळाली आणि कायद्याच्या दृष्टिने सर्व नागरीक समान मानले जाऊ लागले.

कनफ्यूशियसची ख्याती वाढू लागली, तसतसे अधिकाधिक लोकांना त्याच्याकडून शिकण्याची इच्छा होऊ लागली. एकदा तर तो 3000 विद्यार्थ्यांना इतिहास, कला, संगीत आणि काव्यशास्त्र शिकवत होता. पण विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्याचे त्याचे मापदंड उच्च दर्जाचे होते. त्यामुळे केवळ 72 विद्यार्थीच सगळ्या विषयांत उत्तीर्ण होऊ शकले.

कनफ्यूशियसचा दृढ विश्वास होता की राजाचे सर्वप्रथम कर्तव्य असते सदाचारी असणे. यामुळे प्रजेत सुसंवाद निर्माण होऊ शकतो. पण चुंग-तूच्या गव्हर्नर पदाव्यतिरिक्त कनफ्यूशियसला कोणतेही उच्च पद मिळाले नाही, ज्याद्वारे तो नैतिक शासन पद्धतीचे आपले विचार व्यावहारीक रुपात लागू करू शकेल. पण त्याच्याकडून नैतिक सिद्धांत शिकलेले त्याचे अनेक विद्यार्थी शासनात उच्च पदावर पोहोचले, हे पाहून कनफ्यूशियसला समाधान वाटले.

ई.स. पूर्व 478 मध्ये वयाच्या 73 व्या वर्षी कनफ्यूशियसचा मृत्यू झाला. त्याला लू राज्यातील *त्झे* नदीकाठी दफन केले गेले. त्यावेळी 100 पेक्षा जास्त कुटुंबांनी निश्चय केला की या महान शिक्षकाच्या नजिक राहायचे. त्यांनी त्याच्या कबरीनजिक आपली घरे बांधली.



लोक तिथे अभ्यास-चिंतन करत, चर्चा करत. 200 वर्षांपेक्षाही जास्त काळ कनफ्यूशियसच्या विद्यार्थ्यांची कुटुंबे तिथेच स्थायिक होती. आजही या क्षेत्राला *कुंगली चीन* म्हणजे तत्वज्ञ कुंगचे गांव म्हणून ओळखले जाते. पण कुंगचे गावच का? कारण या महान तत्वज्ञाचे खरे नाव *कुंग* होते. लॅटीन आणि इंग्रजी भाषेत बदलून ते कनफ्यूशियस झाले. मूळ नाव होते, *कुंग-फू-त्जू* म्हणजे, तत्वज्ञ कुंग.

गेल्या दोन हजार वर्षांत चीनमध्ये अनेत तत्वज्ञ होऊन गेले. त्यांनी कनफ्यूशियससारखा संपूर्ण विश्वावर आपला प्रभाव टाकला नाही. कनफ्यूशियस धार्मिक नव्हता. पण त्याच्या नैतिकतेसंबंधी विचारांनी धर्माचे रुप घेतले. त्याला *कनफ्यूशियनिस्म* म्हणून ओळखू लागले. चीनमध्ये हा एकमेव राष्ट्रधर्म आहे. कन्फ्यूशियस स्वत:ला कधीच परिपूर्ण मानत नसे. त्याला लोकांनी ईश्वराचे स्थान दिले. आपली शिकवण जगभरात आदरपात्र ठरल्याचे पाहून त्याला निश्चितच अभिमान आणि आनंद वाटला असता. पण स्वत:ला देवाच्या स्थानी बसवणे त्याला अनुचित वाटले असते.